**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.**

---

**लाड पागे समिती शिफारशीनुसार दिवंगत/सेवानिवृत्त सफाई कर्मचारी यांचे वारसांना नियुक्ती देणेबाबत निवड समिती बैठक दिनांक ०९.०३.२०२२**
**इतिवृत्त क्रमांक — २६**

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील लाड कमिटीच्या शिफाराशीनुसार वारसाहक्काने नियुक्तीकरीता रिक्त असलेली पदे भरणेकामी कर्मचारी निवड समितीची बैठक दिनांक ०९.०३.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता अतिरिक्त आयुक्त, (सेवा) नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) अतिरिक्त आयुक्त (सेवा) तथा मुख्य लेखापरिक्षक :- अध्यक्ष
२) उपआयुक्त( प्रशासन ) :- सदस्य
३) उपआयुक्त (समाजकल्याण) :- सदस्य
४) मुख्य वित्त व लेखाधिकारी :- सदस्य
५) संचालक, घनकचरा व्यवस्थापन :- सदस्य सचिव

सदर बैठकीस कर्मचारी निवड समितीचे उपरोक्त सदस्य उपस्थित असल्याने समितीचे कामकाजास सुरुवात झाली. विषयसूचीमधील नमुद विषयांच्या अनुषंगाने चर्चेस सुरूवात करणेत आली.



Scanned with CamScanner

**संदर्भ :** (१) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०११ / प्र.क्र.३२७ / विघयो २, दिनांक २१ ऑक्टोबर २०११
(२) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०१४/प्र.क्र.०७/ महामंडळे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४
(३) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: सफाई-२०१५ प्र.क्र. २६८/महामंडळे,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई, दिनांक ११ मार्च, २०१६

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| १. | **कै. विकी शांताराम जाधव**<br>मयत सफाई कामगार | **श्रीम. पल्लवी विकी जाधव**<br>(पत्नी) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (१) या तरतुदीनुसार "**पत्नी**" या नात्याने **श्रीम. पल्लवी विकी जाधव, हया सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| २. | **श्रीम.छबुबाई शंकर लोंढे**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री. सुनिल शंकर लोंढे**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार "**मुलगा**" या नात्याने **श्री. सुनिल शंकर लोंढे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ३. | **श्रीम. हिराबाई विष्णु लोंढे**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री. रमेश विष्णु लोंढे**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार "**मुलगा**" या नात्याने **श्री. रमेश विष्णु लोंढे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ४. | **कै. भास्कर विष्णु पगारे**<br>मयत सफाई कामगार | **श्री. सुशांत भास्कर पगारे**<br>(मुलगा) | श्री.सुशांत भास्कर पगारे यांचे यांचेविरुध्द दाखल केस न्यायालयाकडे प्रलंबीत होती. सदर केसचा निकाल झाल्याने दुसरे सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.१, नाशिक यांचेकडील नियमित फौजदारी प्रकरण क्र.५१/२०१४ दि.११.१०.२०२१ रोजी चे न्यायनिर्णयाची निकालप्रत श्री.पगारे यांनी सादर केली आहे.सदरच्या न्यायनिर्णय आदेशात आरोपी श्री.सुशांत भास्कर पगारे व इतर चार यांची भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, १४८,३२४,३२३, ५०४ व ५०६ सह वाचनीय कलम १४९ व मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) शिक्षापात्र कलम १३५ या गुन्हयातुन फौजदारी व्यवहार संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत असलेबाबत नमुद आहे.<br>कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/प्र. क्र.३२७/ विघयो -२ दि.२१.ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार "**मुलगा**" या नात्याने **श्री. सुशांत भास्कर पगारे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.**<br>**तथापि**, श्री.सुशांत भास्कर पगारे यांना नियुक्ती आदेश पारित करणेपुर्वी **(१)** सदर निकालाविरुध्द संबंधित पोलीस स्टेशनमार्फत अथवा अन्य त्रयस्थ व्यक्तीने मा. उच्च न्यायालयामध्ये अपिल दाखल केले किंवा कसे याबाबतचा अहवाल संचालक (घ.व्य.वि.) यांचेमार्फत संबंधित पोलीस स्टेशनकडून प्राप्त करुन घेणेत यावा. **(२)** अपिलाबाबत समाधानकारक खुलासा प्राप्त झाल्याची खात्रीनंतर भविष्यात सदर केसबाबत अपिल अथवा केस सिध्द झाल्यास मनपा नियमानुसार होणाऱ्या कारवाईस जबाबदार असेन याबाबत **श्री. सुशांत भास्कर पगारे** यांचे हमीपत्र घेणेत यावे. तदनंतर नियुक्ती आदेश पारीत करणेची कार्यवाही करावी. असे कर्मचारी निवड समिती निर्देश देत आहे. |

**(डॉ.आवेश पलोड)**
**संचालक,घ.व्य.वि**

**(नरेंद्र महाजन )**
**मुख्य वित्त व लेखाधिकार**

**(अर्चना तांबे)**
**उपआयुक्त (समाजकल्याण )**

**(मनोज घोडे पाटील )**
**उपआयुक्त (प्र.)**

**(बी. जी. सोनकांबळे)**
**अतिरिक्त आयुक्त (सेवा) तथा मुख्य लेखापरिक्षक**



Scanned with CamScanner

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| ५. | **कै.शिला चंद्रशेखर गायकवाड**<br>मयत सफाई कामगार | **श्री. सम्राट चंद्रशेखर गायकवाड**<br>(मुलगा ) | श्री. सम्राट चंद्रशेखर गायकवाड यांनी **'स्वच्छता निरिक्षक'** या पदावर नियुक्ती मिळणेस मागणी केली आहे.तथापी, सेवाप्रवेश नियमान्वये स्वच्छता निरिक्षक पदाकरीता शैक्षणिक अर्हतेसोबत आवश्यक असणारी अर्हतेपैकी संबंधित कामाचा ०५ वर्ष अनुभव आवश्यक आहे. त्यास्तव श्री.गायकवाड हे स्वच्छता निरिक्षक पदाच्या नियुक्तीस पात्र होत नसल्याने त्यांची मागणी अमान्य करण्यात येत असुन, कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार " **मुलगा** " या नात्याने **श्री. सम्राट चंद्रशेखर गायकवाड, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ६. | **कै. बाळु मोगल बर्वे**<br>मयत सफाई कामगार | **सौ.वर्षा किशोर तेजाळे**<br>(विवाहीत मुलगी) | डावीकडील **अनु.क्रमांक ०६ ते ०७ प्रकरणी** विवाहीत मुलगी, भाचा, भाची यांचे नामनिर्देशीत व्यक्ती म्हणुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०१४/प्र.क्र.०७/ महामंडळे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ मधील तरतुदी अन्वये नियुक्ती बाबत चे नविन प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.<br>**अनु.क्रमांक ०८** हे प्रकरण दि. ११.०२.२०२२ रोजीचे कर्मचारी निवड समितीच्या निर्देशान्वये नामनिर्देशित- भाची असल्याने लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नियुक्ती देताना येणाऱ्या वारस नामनिर्देशन अडचणींबाबत महाराष्ट्र शासनाकडील मार्गदर्शन येईपावेतो प्रलंबीत ठेवणेत आलेले आहे.<br>**अनु.क्रमांक ०९** हे प्रकरण दि.२९.०७.२०२१ रोजीचे कर्मचारी निवड समितीच्या निर्देशान्वये श्रीम.माया रामदास निकम,यांनी सादर केलेल्या घटस्फोटातील दस्तात त्यांचे वेगवेगळी नावे निदर्शनास येत असल्याने त्याबाबतची तद्अनुशंगीक कागदपत्र सादर करणे बाबत संबंधितास पत्राव्दारे कळविणेत आलेले आहे. **अनु.क्रमांक १०** हे प्रकरण दि. ११.०२.२०२२ रोजीचे कर्मचारी निवड समितीच्या निर्देशान्वये श्रीम.पारुल तनुभाई बारीया, यांनी सादर केलेल्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनात त्या घटस्फोटित असलेबाबत नमुद केले आहे. परंतु,कायदेशीर घटस्फोट झाले असलेबाबत कोणतेही दस्त सादर न केल्याने घटस्फोटाबाबत मा.न्यायालय/ प्राधिकरण यांचेकडील वैध दस्त सादर करणेबाबत संबंधितास पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे.<br>यापुर्वी विवाहीत मुलगी, भाचा-भाची, जावई अशा नामनिर्देशीत वारसांना नियुक्ती दिलेली आहे. त्यानुसार आम्हास नामनिर्देशीत विवाहीत मुलगी म्हणुन नियुक्ती द्यावी.अशी अनु.क्रमांक ०९ व १० चे वारसांनी मागणी केलेली आहे.<br>**अनु.क्रमांक ११ ते १३** हे नामनिर्देशित वारस सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस दि.०४.०१.२०२२ रोजीचे कर्मचारी निवड समितीच्या बैठकीत पुर्नजिवीत / पुन:र्विचार करणेत आलेल्या प्रकरणी कर्मचारी निवड समितीने केलेली आहे. परंतु मा. नियुक्ती प्राधिकरणाची नियुक्ती आदेशावर स्वाक्षरी तथा ईतिवृत्तास मान्यता मिळणेपुर्वीच नव्याने पारित झालेले महाराष्ट्र शासन, नगरपरिषद प्रशासन संचनालय, वरळी, मुंबई यांचेकडील क्र.नपप्रसं-२०२२/लापासका/सर्व न.प. /प्र.क्र.१९/कक्ष-४/२८६ दि.२० जानेवारी २०२२ रोजीच्या प्राप्त झालेल्या शासन पत्रात नात-नातू हे वारसाहक्काच्या नियुक्तीस पात्र ठरत नाही. असे नमुद असल्याने नामनिर्देशीत वारसासंबंधित निगडीत प्रकरणी खात्री करणेबाबत मा.आयुक्त महोदय यांनी दि.१०.०२.२०२२ रोजी आदेशीत केल्याने सदर प्रकरण प्रलंबीत ठेवणेत आलेले आहे. नगरपरिषद प्रशासन संचनालय, मुंबई यांचेकडील दि.२० जानेवारी २०२२ रोजीचे प्राप्त पत्राच्या अनुषंगाने मा.शासनाकडे पत्रव्यवहार केला |
| ७. | **श्रीम. सुमन लक्ष्मण धगाटे**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.विलास अर्जुन काळे**<br>(भाचा) | |
| ८. | **श्री. राजु खिमजी मारु**<br>सेवानिवृत्त स्वच्छता मुकादम | **श्रीम.मनिषा विनोद राठोड**<br>( भाची) | |
| ९. | **श्री. रामदास सिताराम निकम**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्रीम. माया रामदास निकम**<br>(विवाहीत मुलगी ) | |
| १०. | **कै.तनुभाई गिरीधर बारीया**<br>मयत सफाई कामगार | **श्रीम.पारुल तनुभाई बारीया**<br>(विवाहीत मुलगी ) | |
| ११. | **श्रीम. मुन्नी रमेश धुणे**<br>सेवानिवृत्त सफाई कामगार | **श्री. शुभम संतोष वाघ**<br>(भाचा) | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (डॉ.अविश पलांडे)<br>**संचालक,घ.व्य.वि** | (नरेंद्र महाजन )<br>**मुख्य वित्तव लेखाधिकार** | (अर्चना तांबे)<br>**उपआयुक्त (समाजकल्याण )** | **(मनोज घोडे पाटील )**<br>**उपआयुक्त (प्र.)** | **(बी. जी. सोनकांबळे)**<br>**अतिरिक्त आयुक्त (सेवा) तथा मुख्य लेखापरिक्षक** |



Scanned with CamScanner

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| १२. | **श्रीम.हिराबाई गणपत पगारे**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.मयुर ज्ञानेश्वर पगारे**<br>(नातु) | असता,मा. प्र.सहआयुक्त,नगरपरिषद प्रशासन संचनालय,मुंबई यांचेकडील पत्र क्र.नपप्रसं-२०२२/सफाई कामगार नाशिक मनपा /प्र.क्र.८१९ दि.२४ फेब्रुवारी २०२२ रोजीचे शासन पत्र प्राप्त झाले असून - संचालनालयाच्या दिनांक २०.०१.२०२२ व दि.०२.०२.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायतीकरीता मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. महानगरपालिकेचे प्रशासकीय कामकाज शासन स्तरावरुन हाताळणेत येते.नामनिर्देशीत वारसाबाबत महाराष्ट्र शासन, नगरपरिषद प्रशासन संचनालय, यांचेकडील निर्गमित झालेले पत्र हे महानगरपालिकेसाठी नसुन राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायतीकरीता मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या असल्याचे नमुद आहे. |
| १३. | **श्रीम.मिना वामन पवार**<br>वैद्य. कारणास्तव सेवानिवृत्त सफाई कामगार | **श्री.प्रकाश उत्तम पगारे**<br>(नामनिर्देशित- जावई) | **नामनिर्देशीत प्रकरणांबाबत निर्माण झालेल्या विसंगतीबाबत नगरपरिषद प्रशासन संचनालय यांचेकडील दि.२४ फेब्रुवारी २०२२ रोजीचे प्राप्त पत्रान्वये स्पष्टता झाल्याने अनु.क्रमांक ११ ते १३ हया प्रकरणांबाबत दि.०४.०१.२०२२ रोजीचे कर्मचारी निवड समितीच्या बैठकीत नमुद शिफारशीप्रमाणे झालेला निर्णय कायम ठेवणेत येत असुन इतिवृत्तात नमुदनुसार मा.पोलिस आयुक्त यांचेकडील चारित्र पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित वारसाच्या वैयक्तीक संचिकेत नियुक्ती आदेश प्रस्ताव मा.आयुक्त महोदय यांचे स्वाक्षरीस्तव सादर करणेत यावा.**<br>**तसेच,उपरोक्त नमुदनुसार अनु.क्रमांक ०६ ते १० हे सर्व नामनिर्देशीत प्रकरणे असुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०१४/प्र.क्र.०७/ महामंडळे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ मधील तरतुदी अन्वये नामनिर्देशित वारसांची सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करणेत येत आहे.** |
| १४. | **श्रीम.रामीबेन गांडाभाई जाधव**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.हार्दिक कैलास राभडीया**<br>(मुलगा) | मनपा आदेश क्र. १०६ जाक्र.घव्यवि/आस्था/कार्या-०२/५९४/२०२१ दि.१२.०८.२०२१ अन्वये श्री.हार्दिक कैलास राभडीया यांची सफाई कामगार या पदावर नेमणुक करण्यात आली. परंतु श्री.हार्दिक कैलास राभडीया यांची वर्ग ३ क.लिपिक या पदावर नियुक्ती होणेबाबत मागणी कायम असल्याने सदरचा आदेश त्यांनी प्रत्यक्षात स्विकारलाच नाही. श्री.हार्दिक राभडीया यांनी सदरचा आदेश न स्विकारल्याने त्यांना नोटीस व अंतिम नोटीस बजावण्यात आली असता,नोटीसच्या अनुषंगाने श्री.हार्दिक राभडीया यांनी दिनांक २४.०२.२०२२ रोजी खुलासा सादर करुन लाड कमिटी शिफारशीनुसार शैक्षणिक पात्रतेप्रमाणे कनिष्ठ लिपीक पदावर नियुक्ती होणेकामी यापुर्वी वेळोवेळी अर्ज सादर केले असल्याचे नमुद केले असुन, त्यांनी B.A. व LSGD कोर्स उत्तीर्ण ही शैक्षणिक अर्हता धारण केलेली आहे. तसेच, मराठी व इंग्रजी टंकलेखन ३० व ४० ची परिक्षा दि.२७ ते २९ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत दिलेली आहे. कोरोना विषाणुच्या साथरोगामुळे सदर परीक्षेचा निकाल अद्यापपावेतो लागलेला नाही .सदर बाब विचारात घेऊन सदरची नोटीस रद्द करुन मला टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणेस सहा महिन्याची मुदत देण्याच्या अधिन राहुन लिपीक पदावर नियुक्ती मिळणेबाबत मागणी केलेली आहे.<br>नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम अन्वये महापालिकेने प्रस्तावित केलेली कनिष्ठ लिपीक नेमणुकीकरीता अर्हता<br>- (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण<br>(ब) मराठी राज्य शासनाची मराठी टंकलेखन -३० श.प्र.मी.(GPC) किंवा इंग्रजी टंकलेखन -४० श.प्र.मी.उत्तीर्ण<br>(क) महाराष्ट्र राज्य उच्च् व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण किंवा डीओईएससी सोसायटीच्या अधिकृत सीसीसी किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र .<br>(ड) मराठी लिहिता, बोलता व वाचता येणे आवश्यक आहे. |

**(डॉ.आवेश पलोड)**
**संचालक,घ.व्य.वि**

**(नरेंद्र महाजन)**
**मुख्य वित्त व लेखाधिकारी**

**(अर्चना तांबे)**
**उपआयुक्त (समाजकल्याण)**

**(मनोज घोडे पाटील)**
**उपआयुक्त (प्र.)**

**(बी. जी. सोनकांबळे)**
**अतिरिक्त आयुक्त (सेवा) तथा मुख्य लेखापरिक्षक**



Scanned with CamScanner

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| | | | नमुद अर्हता बघता श्री.हार्दिक कैलास राभडीया यांनी (१) B.A. (२) MS-CIT (३) LSGD कोर्स उत्तीर्ण असले बाबत शैक्षणिक अर्हता धारण केली असल्याचे निदर्शनास येत असल्याने महाराष्ट शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : अकंपा-१२२१/ प्र.क्र.९८/का-८ दिनांक २३ जुन २०२१ अन्वये अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या अनुषंगाने टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्याच्या तरतुदीमध्ये सुधारणा केलेली असुन त्यानुसार लिपीक टंकलेखन गट-क या पदावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन २ वर्षाच्या विहित मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. या तरतुदीनुसार श्री.हार्दिक कैलास राभडीया हे कनिष्ठ लिपीक पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.<br>तथापि, कर्मचारी निवड समितीचा अभिप्राय सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणेपुर्वी श्री.हार्दिक कैलास राभडीया, यांनी पदवी, टंकलेखन व MS-CIT बाबत सादर केलेल्या शैक्षणिक गुणपत्रक व प्रमाणपत्रांची खात्री तथा पडताळणी होणे आवश्यक असल्याने संबंधीत संस्थेशी संचालक (घ.व्य.वि) यांचे मार्फत पत्रव्यवहार करणेस कर्मचारी निवड समिती निर्देश देत आहे.<br>श्री.हार्दिक कैलास राभडीया,यांचे शैक्षणिक गुणपत्रक/ प्रमाणपत्राबाबत संबंधीत संस्थेकडून आलेला अभिप्राय / खुलासा समाधानकारक असलेबाबत खात्री झालेनंतर वर्ग—३ करीता पुढील कार्यवाहीस्तव प्रकरण सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणेची कार्यवाही करावी, अशी शिफारस करण्यात येत आहे. |

कर्मचारी निवड समितीसमोर चर्चेसाठी ठेवणेत आलेल्या विषयसूचीनुसार व आयत्यावेळेस सादर केलेले प्रलंबित प्रकरणांबाबत चर्चा करणेत आली. उपरोक्त प्रकरणांच्या अनुषंगाने सादर केलेल्या दस्तांची /कागदपत्रांची पडताळणी करुन कर्मचारी निवड समितीच्या बैठकीत शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच, कर्मचारी निवड समितीची पुढील बैठकीचे नियोजन करणेत यावे असे समितीने सुचित करून बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

(डॉ.आवेश पलोड )
संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

(नरेंद्र महाजन)
मुख्य वित्त व लेखाधिकारी
नाशिक महानगरपालिका, नाशिक

(अर्चना तांबे )
उपआयुक्त (समाजकल्याण),
नाशिक महानगरपालिका, नाशिक

(मनोज घोडेपाटील )
उपआयुक्त (प्र.)

(बी. जी. सोनकांबळे)
अतिरिक्त आयुक्त,सेवा तथा मुख्य लेखापरिक्षक

प्रत:- माहितीस्तव सविनय सादर
मा.प्रशासक सो.मनपा, नाशिक



Scanned with CamScanner